# आंतरराष्ट्रीय संशोधन परिषद उद्यापासून

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

'शिवाजी विद्यापीठाच्यावतीने 'फिजिक्स ऑफ मटेरियल अँड मटेरियल बेस्ड डिव्हाइस फॅब्रिकेशन' या विषयावर चौथ्या आंतरराष्ट्रीय संशोधन परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. १० व ११ जानेवारी रोजी होणाऱ्या या परिषदेत आंतरराष्ट्रीय संशोधकांचे मार्गदर्शन मिळणार आहे,' अशी माहिती शिवाजी विद्यापीठाचे प्र कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी पत्रकार परिषदेत दिली.

भौतिकशास्त्र विभाग सभागृहात सकाळी साडेदहा वाजता वाराणासी आयआयटीचे प्रमुख जितेंद्र कुमार यांच्या हस्ते उदघाटन होणार आहे. यावेळी पी. चक्रवर्ती प्रमुख पाहुणे तर अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे उपस्थित राहणार आहेत.

डॉ. शिर्के म्हणाले, 'भौतिकशास्त्र विभागाला विविध शैक्षणिक उपक्रमांसाठी अनुदान मिळाले आहे. त्यातून संशोधनप्रकल्पांना गती आली आहे. या परिषदेमध्ये विविध क्षेत्रातील पदार्थविज्ञान विषयाशी निगडीत असलेल्या व्यावसायिक व उद्योजक यांना एकत्र आणण्याचा हेतू आहे. फोटो कॅटलिसिस, कार्बन नॅनोट्यूब, नॅनो साहित्य, होलोग्राफी, नॅनो सेन्सर, सुपरकॅपॅसिटर, सौर कौशिका, बायो साहित्य, फोटोनिक्स, अवकाश संशोधन यावर होणारा परिणाम व बदल याबाबत संवाद साधण्याची संधी मिळणार आहे.'



या परिषदेसाठी दक्षिण कोरिया, तैवान, जपान, रशिया येथून आंतरराष्ट्रीय संशोधक सहभागी होणार आहेत. तसेच दीडशेहून अधिक संशोधन प्रकल्प सादर करण्यात आले आहेत.

पहिल्या सत्रात डॉ. पी. एस. पाटील, प्रा. डॉ. डी. पी. अमालनेकर व डॉ. व्ही. बी. पाटील यांचे व्याख्यान होणार आहे. दुपारच्या सत्रात डॉ. के. वाय. राजपुरे, जपान येथील डॉ. पंकज कोइनकर, तैवान येथील डॉ. डब्ल्यू सी. चांग, डॉ. केह मोह लीन यांचे व्याख्यान होणार आहे. तर सायंकाळच्या सत्रात डॉ. व्ही. आर. पुरी, डॉ. आर. एम. माने यांचे मार्गदर्शन होणार आहे.

पत्रकार परिषदेस उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. व्ही. जे. फुलारी, डॉ. पी. एस. पाटील, समन्वयक डॉ. ए. व्ही. मोहोळकर, डॉ. एन. एल. तरवाल, डॉ. एन.जी. देशपांडे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
9 JAN 2019
पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठामध्ये आंतरराष्ट्रीय संशोधन परिषद

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठापीठाच्या भौतिकशास्त्र विभागातर्फे दोनदिवसीय आंतरराष्ट्रीय संशोधन परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. 'मटेरियल अँण्ड आणि मटेरियल्स बेस्ड डिव्हाईस फॅब्रिकेशन' हा परिषदेचा मुख्य आशय असून गुरुवार, दि. १० रोजी सकाळी १० वाजता परिषदेचे उद्घाटन होणार असल्याची माहिती शिवाजी विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. डी. टी शिर्के यांनी पत्रकार परिषदेत दिली..

डॉ. शिर्के म्हणाले, विविध क्षेत्रातील पदार्थ विज्ञान विषयाशी निगडित असलेल्या व्यावसायिक आणि उद्योजकांना एकत्र आणून त्यावर संशोधनात्मक विचारविनिमय होण्याच्या उद्देशाने शिवाजी विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभाग आणि महाराष्ट्र अॅकॅडमी ऑफ सायन्सच्या वतीने आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. ही परिषद विभागाच्या ऑडिटरूममध्ये होणार आहे. या परिषदेत संशोधक तज्ज्ञांना विचारांचे आदानप्रदान करण्यासाठी संधी मिळणार असून, फोटो कॅटलिसिस, कार्बन नॅनोट्यूब, होलोग्राफी, नॅनो सेन्सॉर, बायोफिजिक्स, अवकाश संशोधन यासह अनेक विषयांवर विचारमंथन होणार आहे. यासाठी देशभरातून वक्ते आणि तज्ज्ञ उपस्थित राहणार असून परिषदेसाठी दीडशेपेक्षा अधिक संशोधन पत्रिका सादर करण्यात येणार आहेत. परिषदेचे उद्घाटन आयआयटी वाराणसीचे जितेंद्र कुमार आणि प्रा. पी. चक्रवर्ती यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये, तर कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. पत्रकार परिषदेला उपकुलसचिव व्ही. एन. शिंदे, संयोजक डॉ. ए. व्ही. मोहोळकर, वित्त आणि लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, प्रा. पी. एस. पाटील, डॉ. विजया पुरी, प्रा. व्ही. जे. फुलारी आदी उपस्थित होते.

सकाळ

# भौतिकशास्त्र विभागातर्फे आंतरराष्ट्रीय संशोधन परिषद

कोल्हापूर, ता. ८ : शिवाजी विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र अधिविभागातर्फे १० व ११ जानेवारीदरम्यान 'मटेरियल्स अँड मटेरियल्स बेस्ड डिव्हाइस फॅब्रिकेशन' विषयावर आंतरराष्ट्रीय संशोधन परिषद होत आहे. भौतिकशास्त्र अधिविभागाच्या सभागृहात सकाळी १०.३० वाजता परिषदेचे उद्‌घाटन होईल. दीडशेहून अधिक संशोधन पत्रिका आल्या असून, तीनशेहून अधिक संशोधक परिषदेत सहभागी होतील, अशी माहिती प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी आज येथे पत्रकार परिषदेत दिली.

डॉ. शिंदे म्हणाले, ''फोटो कॅटलिसिस, कार्बन नॅनोट्यूब, नॅनो साहित्य, होलोग्राफी, नॅनो सेन्सर, सुपरकॅपॅसिटर, सौर कौशिका, बायो साहित्य, फोटोनिक्स, बायो सेंसर, ऊर्जा संरक्षण, आण्विक यंत्रे, एरोजेल्स, बायो टेक्नॉलॉजी, नॅनो कंपोजिटस, बायो फिजिक्स, अवकाश संशोधन उपयुक्त सामग्री, नॉनलाइनर ऑप्टिक्स, थिन आणि थिक फिल्म डिव्हाइसेस, नॅनोटेक्नॉलॉजी, साहित्य साधने यांच्यावर होणारा प्रारणांचा पहिला आणि त्यानुसार होणारे बदल अशा विषयासंबंधी परिषदेत संवाद साधला जाणार आहे.'' ते म्हणाले, ''आय.आय.टी.तील प्रा. जितेंद्र कुमार, प्रा. पी. चक्रवर्ती प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील. भारतासह दक्षिण कोरिया, जपान, रशिया येथून तज्ज्ञ व्याख्याते परिषदेत सहभागी होत आहेत.''

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
9 JAN 2019
Times of India

# SUK's physics dept gets ₹2cr assistance

Piyush.Bhusari@timesgroup.com

**Kolhapur:** The department of physics of the Shivaji University, Kolhapur (SUK) has received Rs 1.98 crore in the 2018-19 academic year, owing to its research outputs in recent years, head of the department V J Fulari said on Tuesday.

The department has been included in the special assistance programme of the University Grants Commission (UGC) and has received more than Rs 10 crore in the past few years via the department of special assistance and departmental research support programmes, which were set up to create feeder departments for the centre of advanced study.

## TO FOCUS ON MATERIAL SCIENCE

Fulari said the focus for the department is material science. The department has also received around Rs 7 lakh to organise an international conference on physics of materials and materials based device fabrication, which is scheduled on January 10 and 11 on the SUK campus.

"Owing to the department's excellent research output and publications, experts from the national and international community will attend the conference," he said.

The special assistance programme was initiated in 1963 by the UGC following recommendations of the education commission to facilitate select university departments having potential in research and teaching.

The programme is intended to encourage pursuit of excellence and teamwork in advanced teaching and research to accelerate realization of international standards in specific fields. The first such programme was started as the centre of advanced study in 1963.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठात १०, ११ रोजी आंतरराष्ट्रीय संशोधन परिषद

## देश-विदेशांतील ३०० संशोधकांची उपस्थिती

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागाच्या वतीने १० व ११ जानेवारी २०१९ या कालावधीत दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय संशोधन परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. परिषदेची मुख्य संकल्पना ही 'मटेरियल्स आणि मटेरियल्स बेस्ड डिव्हाईस फॅब्रिकेशन' या विषयावर आधारित असल्याची माहिती प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी मंगळवारी पत्रकार परिषदेत दिली.

डॉ. शिर्के म्हणाले, भौतिकशास्त्र विभागाचे पदार्थविज्ञान शास्त्रमधील संशोधन जागतिक पातळीवर अग्रेसर आहे. परिषदेसाठी भारतासह दक्षिण कोरिया, जपान, रशिया, तैवान या देशांतील तीनशेहून अधिक संशोधक उपस्थित राहणार आहेत. पदार्थविज्ञानशास्त्र संशोधन परिषदेत संशोधक, उद्योजक यांच्यात संवाद होणार असल्याने त्याचा चांगला उपयोग होईल. परिषदेचे संयोजक म्हणून डॉ. ए. व्ही. मोहोळकर हे काम पाहणार आहेत. यासाठी विविध समित्यांची स्थापना करण्यात आली आहे. गुरूवारी सकाळी दहा वाजता उद्घाटन कार्यक्रमास प्रा. जितेंद्र कुमार हे प्रमुख पाहुणे असतील तर कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे अध्यक्ष असणार आहेत. यासह प्रा. पी. चक्रवर्ती हे प्रमुख उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रम भौतिकशास्त्र विभाग येथे होईल. पत्रकार परिषदेस वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, डॉ. पी. एस. पाटील, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आदी उपस्थित होते.

**'एच' इंडेक्समध्ये अव्वल**

जागतिक स्तरावर संशोधनाचे काटेकोर कसोटीवर मापदंड असणा-या 'एच' इंडेक्समध्ये भौतिकशास्त्र विभाग अनेक वर्षांपासून आजतागायत अव्वल आहे. या इंडेक्समध्ये तुलनेने शिवाजी विद्यापीठाचा क्रमांकही खूप वरचा लागत असल्याची माहिती यावेळी डॉ. शिर्के यांनी दिली..

लोकमत

# विद्यापीठात उद्यापासून संशोधन परिषद

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील भौतिकशास्त्र अधिविभागातर्फे उद्या, गुरुवारी आणि शुक्रवारी (दि. ११) आंतरराष्ट्रीय संशोधन परिषद आयोजित केली आहे. त्यामध्ये 'पदार्थविज्ञान संशोधन' या विषयावर विचारमंथन होणार आहे. परिषदेत दक्षिण कोरिया, तैवान, जपान, रशियामधील तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. अशी माहिती प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के आणि विज्ञान आणि तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. पी. एस. पाटील यांनी मंगळवारी येथे पत्रकार परिषदेत दिली. डॉ. शिर्के म्हणाले, या संशोधन परिषदेचे उद्घाटन गुरुवारी सकाळी दहा वाजता भौतिकशास्त्र विभागाच्या सभागृहात कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते, तर आयआयटी वाराणसीचे प्रा. जितेंद्र कुमार, पी. चक्रवर्ती प्रमुख उपस्थित असणार आहेत. समारोप शुक्रवारी दुपारी साडेतीन वाजता होणार आहे.

Kolhapur Main
Page No. 4 Jan 09, 2019
Powered by: erelego.com

# विद्यार्थी करताहेत परदेशात संशोधन

कोल्हापूर टाइम्स टीम

उच्चशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांमधील संशोधनवृत्तीला चालना देण्यासाठी शिवाजी विद्यापीठातर्फे विविध परदेशी विद्यापीठांसोबत करण्यात आलेल्या कराराचा फायदा विद्यार्थ्यांना होत आहे. नॅनो सायन्स विभाग आणि दक्षिण कोरियातील मॉंजी युनिव्हर्सिटीमध्ये झालेल्या करारामुळे सध्या २० विद्यार्थ्यांना परदेशात संशोधन करण्याची संधी मिळाली आहे.

**नॅनो सायन्स एमओयूचा २० विद्यार्थ्यांना फायदा**

शिवाजी विद्यापीठाने देशस्तरासह परदेशातील विद्यापीठांसोबत ९८ सामंजस्य करार केले आहेत. गेल्या वर्षभरात नॅनो सायन्स या विभागाने दक्षिण कोरियातील मॉंजी युनिव्हर्सिटी व पुणे येथील नॅशनल केमिकल लॅब यांच्यासोबत सामंजस्य करार केला आहे. नॅनो इलेक्ट्रॉनिक्स, नॅनो फिजिक्स, नॅनो केमिकल, नॅनो बायोटेक्नॉलॉजी या विषयात संशोधन करण्याची इच्छा असलेल्या, तसेच पीएच.डी. पदवी परदेशी विद्यापीठातून संपादन करण्याचे स्वप्न पाहणाऱ्या विद्यार्थ्यांसह अधिव्याख्यातांना संधी खुल्या झाल्या आहेत. या कराराच्या माध्यमातून नॅनो सायन्स विभागातील दोन विद्यार्थी सध्या कोरियातील विद्यापीठात संशोधन करत आहेत. तर दोन विद्यार्थ्यांना एम. फिल. करण्याची संधी मिळाली आहे.

शास्त्र शाखेतून संशोधन करण्यासाठी विद्यार्थ्यांची संख्या अधिक आहे. सध्या नॅनो सायन्स या शाखेतील संशोधन उपयोजित ठरत आहे. तसेच इंडस्ट्रीमध्ये नॅनो सायन्स विषयातून होणाऱ्या संशोधनाचा प्रत्यक्ष वापर करण्यावर भर दिला जातो. परिणामी नॅनो सायन्स विभागाने केलेल्या सामंजस्य कराराचा थेट फायदा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्याला दिशादर्शक ठरत आहे. गेल्या वर्षभरात करण्यात आलेल्या सामंजस्य कराराची मुदत पाचवर्षांसाठी असल्याने विद्यार्थी व प्राध्यापकांना संशोधनासाठी पुरेसा वेळ या कालावधीत मिळत आहे.



## पेटंटचा प्रस्ताव

उच्चशिक्षणस्तरावर अधिव्याख्यातांनाही सतत बदलणाऱ्या तंत्रज्ञानासोबत अपडेट रहावे लागते. जागतिक स्तरावर उच्चशिक्षणामध्ये सुरू असलेल्या संशोधनक्षेत्रात काय सुरू आहे याची माहिती घ्यावी लागते. त्यामुळे विद्यापीठाच्या नॅनो सायन्स विभागाने परदेशी विद्यापीठांसोबत केलेल्या सामंजस्य करारानुसार प्राध्यापकांनीही पेटंटसाठी संशोधन प्रकल्प सादर केले आहेत. डॉ. पी. एस. पाटील यांनी कोरियन विद्यापीठाकडे तर प्रा. के. के. शर्मा यांनी दोन परदेशी विद्यापीठांकडे पेटंट प्रस्ताव दिला आहे.

## सामंजस्य कराराचा फायदा

नॅनोसायन्स विभागातील २० विद्यार्थ्यांनी सामंजस्य कराराचा फायदा करून घेतला आहे. सामंजस्य करारानुसार परदेशी शिक्षण, संशोधन व प्रकल्प सादर करण्यासाठी जाणाऱ्या विद्यार्थ्यांना संबंधित विद्यापीठांकडून आर्थिक सहाय्य दिले जाते. आजमितीस तैवान, दक्षिण कोरिया, फ्रान्स, स्काटलंड, चीन येथे या विद्यार्थ्यांचे संशोधन सुरू आहे. एखाद्या प्रकल्पातील संशोधकमांडणीवर आधारीत निर्मिती, उत्पादन व उपयोगिता या तीन स्तरावर नॅनो सायन्स विभागातील संशोधनाला सामंजस्य कराराअंतर्गत मिळणाऱ्या परदेशी विद्यापीठातील आधुनिक शिक्षणपद्धतीचा आधार मिळत आहे.

“

विद्यार्थीदशेत संशोधनामध्ये रस घेऊन भरीव काम करणाऱ्या विद्यार्थ्यांची मोठी संख्या परदेशात आहे. उच्चशिक्षणानंतर संशोधन हे तेथील समीकरण आहे. अशाप्रकारचे ध्येय शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थ्यांमध्ये निर्माण व्हावे यासाठी सामंजस्य करारांचा खूप मोठा फायदा होत आहे. नॅनो सायन्सद्वारे होणारे संशोधन समाजाच्या विकासात मोठे योगदान ठरू शकते. त्यादृष्टीने सामंजस्य कराराचे काम सुरू आहे.

– डॉ. देवानंद शिंदे, कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

पुढारी

# भौतिकशास्त्र विभागाची १० कोटींची प्रयोगशाळा

## शिवाजी विद्यापीठातून

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या पदार्थविज्ञानशास्त्र शाखेचा (मटेरियल्स सायन्स) जागतिक स्तरावर दबदबा आहे. या शाखेच्या संशोधनाची दखल जागतिक स्तरावर मानांकन करणाऱ्या विविध संस्थांनी घेतली आहे. या संशोधनास अधिक बळ मिळावे, यासाठी भौतिकशास्त्र विभागात सुसज्ज आणि अत्याधुनिक साहित्य असणारी १० कोटी रुपये खर्चून प्रयोगशाळा उपलब्ध होणार आहे.

विद्यापीठाच्या संशोधकांना उत्कृष्ट सुविधा असाव्यात, यासाठी ही प्रयोगशाळा साकारण्यात आली आहे. या प्रयोगशाळेचा लाभ देश-विदेशातील संशोधक घेत असल्याची माहिती प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी दिली. विद्यापीठ यापुढे नुसते संशोधनावरच थांबणार नसून, या संशोधनातून साधनांची निर्मिती करणे आणि यानंतर या निर्मितीचे मार्केटिंग करण्याचा उपक्रम लवकरच हाती घेतला जाणार असल्याचे यावेळी डॉ. शिर्के यांनी स्पष्ट केले. कारण, संशोधनाचा फायदा विद्यापीठाला झाला पाहिजे, ही भूमिका अलीकडे प्रशासनाने घेतली आहे. त्यामुळे याबाबत कार्यवाही सुरू असून, या गोष्टीस यश येईल, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली.

**किचन गार्डन प्रशिक्षणाचे वर्ग**

विद्यापीठाच्या लोकविकास केंद्रामार्फत किचन गार्डन प्रशिक्षण वर्ग दि. ११ जानेवारी ते २६ एप्रिल या कालावधीत प्रत्येक शुक्रवारी लोकविकास केंद्रामध्ये घेण्यात येणार आहेत. या प्रशिक्षणात घरगुती कचऱ्याचे व्यवस्थापन, भाजीपाला व फळे यांची लागवड, टेरेस व बाल्कनी गार्डन, होम गार्डन, ग्राफ्टिंग तसेच जैविक खते व जंतुनाशके यासह किचन गार्डनिंगचे विविध प्रकार शिकवले जाणार आहेत. दुपारी १ ते ३ या वेळेत असणारा हा कार्यक्रम पूर्णपणे मोफत असून, त्यासाठी वयाची व शिक्षणाची कोणतीही अट नाही. इच्छुकांनी त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन लोकविकास केंद्रातर्फे करण्यात आले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- 9 JAN 2019
तरुण भारत

# विद्यापीठात शुक्रवारपासून किचन गार्डन प्रशिक्षण

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या लोकविकास



केंद्रामार्फत किचन गार्डन प्रशिक्षण वर्गाचे आयोजन केले आहे. ११ जानेवारी ते २६ एप्रिल या कालावधीत प्रत्येक शुक्रवारी दुपारी १ ते ३ या वेळेत लोकविकास केंद्रामध्ये हे प्रशिक्षण घेण्यात येणार आहे. यामध्ये घरगुती किचन व्यवस्थापन, भाजीपाला व फळे यांची लागवड, टेरेस व बाल्कनी गार्डन, होम गार्डन, ग्राफटींग तसेच जैविक खते व जंतूनाशके, किचन गार्डनिंगचे विविध प्रकार शिकविले जाणार आहेत. हे प्रशिक्षण मोफत असून त्यासाठी वयाची व शिक्षणाची कोणतीही अट नाही. इच्छुकांनी त्याचा लाभ घ्यावा असे आवाहन लोकविकास केंद्रातर्फे केले आहे.

- 9 JAN 2019
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दिव्यांगांकडे सहायकाच्या भूमिकेतून पहावे

## डॉ. राजेंद्र हिरेमठ यांचे प्रतिपादन : शिवाजी विद्यापीठात दिव्यांग हक्क कायदा कार्यशाळा उत्साहात

प्रतिनिधी
कोल्हापूर

शैक्षणिक, प्रशासकीय, क्रीडा, सांस्कृतिक क्षेत्रांमध्ये दिव्यांगांनी भरारी घेतली आहे. दिव्यांगाकडे समाजाने सहायकाची भूमिकेतून पहावे. त्यातून दिव्यांग देश घडवण्यामध्ये निश्चितपणे हातभार लावतील, असे प्रतिपादन सावित्रीबाई पुणे विद्यापीठाचे सिनेट सदस्य डॉ. राजेंद्र हिरेमठ यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्त्रोत केंद्र-समावेशी शिक्षण संसाधन केंद्र, यु.जी.सी. स्कीम फॉर पर्सन विथ डिसेबल आणि सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्राच्या संयुक्त विद्यमाने जागतिक ब्रेल दिनी 'दिव्यांग हक्क कायदा २०१६' वर कार्यशाळा घेण्यात आली. कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी ते प्रमुख



पाहुणे म्हणून बोलत होते. छ.राजर्षी शाहू सिनेट सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर होते. यावेळी सेंटर फॉर इन्क्लुझिव्ह एज्युकेशन आणि अक्सेसिबिलिटी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील समन्वयक धनंजय भोळे होते.

पुढे डॉ. हिरेमठ म्हणाले, दिव्यांगांना अधिकार प्रदान करण्याचे मोठे कार्य सरकारने सुरू केले आहे. मनामध्ये दिव्यांगांप्रती वेगळेपणाची असलेली भावना नष्ट झाल्यानंतर ही दरी कमी होणार आहे. तयासाठी सर्वसामान्यांमध्ये जाणीवजागृती आवश्यक आहे. क्षमता आणि पात्रतेचा विचार केला तर दिव्यांग सर्वसामान्यांपेक्षा वेगळे नसल्याचे त्यांनी सांगितले.

हेल्पर्स ऑफ दी हॅन्डीकॅपच्या अध्यक्षा नसीमा हुरजूक म्हणाल्या, दिव्यांगांना कायद्याने प्राप्त झालेले हक्क सर्वच क्षेत्रामध्ये अंमलात आणले जावेत, हा या कायद्याचा मुख्य उद्देश आहे. कायद्याने दिव्यांगांना समान संधी, हक्क आणि संरक्षण प्राप्त होण्यासाठी मदत झालेली आहे.

अडचणींकडे संधी म्हणून पाहून नवी दृष्टी निर्माण करण्यासाठी दिव्यांगांना बळ देणे गरजेचे आहे. विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर म्हणाले, दिव्यांगांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सामुहीक प्रयत्न केल्यास जगामध्ये ते आदर्शवत होतील. विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयांमध्ये दिव्यांगांना सहजपणे वावरता येईल यासाठी प्रयत्न केले जात आहेत. योग्य वयात दिशा मिळाली तर समाजामध्ये त्यांचे जगणे सुसह्य होणार असल्याचे त्यांनी सांगितले. दिव्यांगांच्या कार्य कौशल्याचा समावेश असलेल्या 'गगनाला पंख नवे' व 'दिव्यांगज' लघुचित्रफीत दाखवण्यात आली. याप्रसंगी, डॉ. अंजली निगवेकर यांची संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग प्रमुखपदी नियुक्ती झाल्याबद्दल विशेष सत्कार करण्यात आला.

संयोजक डॉ. नमिता खोत यांनी स्वागत केले. डॉ. प्रतिभा देसाई यांनी प्रास्ताविक केले. डॉ. नंदा पारेकर यांनी आभार मानले.

# 'किचन गार्डन प्रशिक्षण'

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या लोकविकास केंद्रामार्फत किचन गार्डन प्रशिक्षण वर्ग शुक्रवार (दि. ११) ते दि. २६ एप्रिल या कालावधीत प्रत्येक शुक्रवारी दुपारी एक ते तीन या वेळेत लोकविकास केंद्रामध्ये घेण्यात येणार आहे. हा कार्यक्रम पूर्णपणे मोफत असून, त्यासाठी वयाची व शिक्षणाची कोणतीही अट नाही.

# ब्रेल लेखन, वाचन स्पर्धा

कोल्हापूर : लुई ब्रेल यांच्या पुण्यतिथीनिमित्त सक्षम संस्थेतर्फे नूतन मराठी विद्यालयात ब्रेल लेखन वाचन स्पर्धा झाली.

निवृत्त शिक्षक वसंत सुतार, विकास हायस्कूलचे अजय वणकुद्रे आणि 'सक्षम'चे अध्यक्ष गिरीश करडे यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्‌घाटन करण्यात आले. अंधशाळेचे गौतम कांबळे यांनी कविता सादर केली. साहित्यिक सुधा मूर्ती यांच्या 'गोष्टी माणसांच्या' पुस्तकाचे वाचन झाले. विद्यापीठाच्या संगीत विभागप्रमुख डॉ. अंजली निगवेकर परीक्षक होत्या.